गुरुवार दि.११ एप्रिल २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २३०
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता

बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com

# महायुतीला पाठिंबा देताच राज ठाकरेंना धक्का

# डोंबिवलीतील मनसे पदाधिकाऱ्यांचा राजीनामा

## बदलत्या भूमिकांमुळे कार्यकर्ते संभ्रमात



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

लोकसभा निवडणुकीत राज ठाकरे यांनी महायुतीला बिनशर्त पाठिंबा देण्याची घोषणा केल्यानंतर राज्यभरात त्याचे पडसाद उमटत आहेत. राज ठाकरे यांच्या डोंबिवलीतील मनसे पदाधिकाऱ्यांनी राजीनामा दिले आहेत. तर राज ठाकरे यांनी महायुतीला पाठिंबा दिल्याने ठाण्यातील उत्तर भारतीय पदाधिकाऱ्यांनी देखील ठाकरे गटाची वाट धरल्याची घटना समोर आली आहे.

डोंबिवलीतील मनसेचे पदाधिकारी मिहिर दवते यांच्यासह सात जणांनी राजीनामा दिला आहे. राज ठाकरे यांच्या बदलत्या भूमिकेमुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम वाढल्याने मी राजीनामा दिल्याचे मिहिर दवते यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. मनसेच्या सोशल मिडिया ग्रुपवर राजीनामा दिला आहे. राज ठाकरे यांच्या भूमिकेनंतर डोंबिवलीतील अनेक मनसे पदाधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे आता डोंबिवलीत राजीनाम्याचे लोण आणखी पसरणार का? मनसेला राज्यभरात खिंडार बसणार का, असा सवाल देखील उपस्थित केला जात आहे.राज ठाकरे यांच्या निर्णयानंतर मनसेचे सरचिटणीस किर्तीकुमार शिंदे यांनी फेसबुकवर पोस्ट शेअर करत मनसेला अलविदा करत असल्याचे जाहीर केले होते. २०१९ मध्ये लोकसभा निवडणुकांवेळी राज ठाकरे यांनी मोदी-शाह यांच्याविरोधात भूमिका घेतली होती. आज अत्यंत निर्णायक क्षणी राजसाहेबांनी राजसाहेबांनी भूमिका बदलली. प्रबोधनकारांचा वारसा जपण्याचा प्रयत्न करणाऱ्या माझ्यासारख्याला 'भामोशा'चं असलं राष्ट्रीयत्व- 'हिंदुत्व' मान्यच होऊ शकत नाही. त्यामुळे मी मनसेचे सरचिटणीसपद आणि प्राथमिक सदस्यत्त्वाा राजीनामा देत असल्याचे किर्तीकुमार शिंदे यांनी स्पष्ट केले.राज ठाकरे यांनी महायुतीला पाठिंबा दिल्याने फक्त मनसेतच नव्हे तर भाजपमध्येही नाराजीचे वातावरण आहे. राज ठाकरे यांनी महायुतीला दिलेल्या पाठिंब्याच भाजपच्या प्रमुख नेत्यांनी स्वागत केले होते. त्यामुळे ठाण्यातील भाजपचे उत्तर भारतीय पदाधिकारी प्रचंड संतापले.या नाराज पदाधिकाऱ्यांनी बुधवारी सकाळी मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरे यांच्या हस्ते शिवबंधन बांधून घेतले. ज्या राज ठाकरे यांनी उत्तर भारतीयांना कायम त्रास दिला, 'उत्तर भारतीय हटाव', अशी भूमिका घेतली त्यांना महायुतीत घेतल्याने भाजपचे हे पदाधिकारी नाराज झाल्याचे सांगितले जाते.

## दसरखेड -विवरा डांबरी रस्त्याच्या साईड पट्ट्या तात्काळ भरा

# अन्यथा पायीं दिंडी काढून हायवेवर रास्ता रोकोचा शिवसेना (उ.बा.ठा) चा ईशारा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी । मलकापूर**



तालुक्यातील दसरखेड - विवरा रस्त्याचे डांबरीकरण कामात संबंधित ठेकेदाराने हलगर्जीपणा केला असुन रुंदीकरणात कमी जास्त केलेला आहे.तसेच रस्त्याच्या दुतर्फा साईड पट्ट्या भरल्या नसल्याने या रस्त्यावर अपघात होवून जिवितहानी होण्याची दाट शक्यता असल्याने शिवसेना (उ.बा.ठा) ने या संदर्भात कार्यकारी अभियंता सां.बा विभाग सचिन तायडे यांना आज दि.८ एप्रिल रोजी निवेदन देवून पाच दिवसांत रस्त्यावरील दुतर्फा साईड पट्ट्या न भरल्यास विवरा ते दसरखेड पायी दिंडी काढून नॅशनल हायवे क्रमांक सहावर रास्तारोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, दसरखेड -विवरा रस्त्या कामात ठेकेदाराने कामचुकारपणा केला असून बऱ्याच ठिकाणी रुंदीकरण कमी- जास्त केलेला आहे. तसेच रस्त्याच्या दुतर्फा साइड पट्ट्या भरल्या नसल्याने रोड खचून जात आहे. साईड पट्ट्या भरल्या नसल्यामुळे एक वाहत जर समोरुन आल्यास दुसऱ्या वाहनास जागा राहत नाही त्यामुळे एखाद्या वेळेस अपघात होऊ शकतो.येत्या पाच दिवसात जर साईट पट्ट्या न भरल्यास विवरा ग्रामस्थ विवरा ते दसरखेड पायी दिंडी काढून हायवे नंबर सहावर एमआयडीसी फाट्यावर रास्ता रोको आंदोलन करतील होणाऱ्या परिणाम ची जबाबदारी सां.बा.विभाग कार्यालयावर राहील असे निवेदनात नमूद केले आहे. निवेदनावर शिवसेना उबाठा विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत, शहर प्रमुख गजानन ठोसर, उपशहरप्रमुख बाळू पोलाखरे, युवा सेना शहरप्रमुख पवन गरुड, किसान सेना शहरप्रमुख सै.वसीम,पवन सोनोने, नंदकिशोर मावळे, पुंजाजी चोपडे, गणेश कडू, श्रीकृष्ण चौधरी, निखिल नाफडे, शांताराम पाटील, प्रशांत चोपडे ,मनोहर बोंडे, गणेश सोनोने, अनिल बोरले, दयाराम बोदडे, संतोष देशमुख, सुधाकर नाफडे, ज्ञानेश्वर कडू, आशिष बोरले, संदीप धांडे,अजाबराव जुनारे ,बाळू पाटील, यशवंत देशमुख, संतोष धांडे, पुंजाजी भादलकर, संदीप दीक्षित, मोहन सोनोने सह विवरा ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या नमूद आहेत.

## डॉ.डी.व्ही.खरात यांना सामाजिक सेवा कार्यासाठी तिसरा अंतर्राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**चिखली । ज्ञानेश्वर बुधवत**

आपल्या अंदाजे पस्तीस वर्षांच्या सामाजिक कार्यास्तव तसेच स्थानिक नागसेन बुद्ध विहार संस्था संस्थापना पासून तर सचिव या नात्याने कार्यरत असताना निरपेक्ष तथा निस्वार्थ भावनेने केलेल्या सांस्कृतिक व सेवाभावी शैक्षणिक कार्यासाठी साऊथवेस्टर्न अमेरिकन विद्यापीठा तर्फे मानद डॉक्टरेट पदवी तसेच सुप्रसिद्ध साहित्यधारा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचा नेपाळ येथे प्रदान अंतर्राष्ट्रीय समाज भूषण पुरस्कार प्राप्त आणि सोबतच केंद्रीय मानवाधिकार संगठन, नई दिल्ली च्या वतीने जाहीर केलेल्या राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्काराचे मानकरी व महाराष्ट्र सामाजिक न्याय पुरस्काराने छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्ताने कोल्हापूर येथील छ. श्री. शिवाजी विद्यापीठ येथे २०२३ मध्ये सन्मानित करण्यात आलेल्या डॉ. डी. व्ही खरात यांना त्यांच्या या सामाजिक योगदानाबद्दल तिसऱ्यांदा ' भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अंतरराष्ट्रीय एकता पुरस्कार ' घोषित झाला असून सदर पुरस्कार त्यांना दि. ११-०४-२०२४ रोजी क्रान्तिज्योती म. ज्योतिबा फुले यांच्या जयंतीच्या पावन पर्वावर सत्य शोधक समाज प्रबोधन व संकल्प फाऊंडेशन, मुंबई च्या तर्फे एम्. एस्. पी. सभागृह, सदाशिव पेठ, पुणे येथे आयोजित गुणगौरव समारंभामधे प्रदान करण्यात येत आहे. या पुरस्काराने डॉ. खरात यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून या निमित्ताने नागसेन ची किर्ती अंतर्राष्ट्रीय स्तरावर पोचली आहे. डॉ. खरात यांना या अगोदरही अनेक पुरस्कार मिळाले असून सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षात होत आहे.




## हिंगोली लोकसभा मतदारसंघातील ३३ उमेदवारांना निवडणूक चिन्हाचे वाटप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । भगवान जाधव**

हिंगोली लोकसभा मतदार संघात पात्र ३३ उमेदवार निवडणूक रिंगणात राहणार असून, त्या सर्व उमेदवारांना दि. ८ एप्रिल रोजी निवडणूक चिन्हाचे वाटप करण्यात आले. उमेदवारांची नावे, पक्ष आणि चिन्हाचा तपशील पुढील प्रमाणे असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी दिली आहे.

निवडणूक रिंगणात असलेले उमदेवार, त्यांचा पक्ष आणि चिन्हांचा तपशील :आष्टीकर पाटील नागेश बापुराव शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) - मशाल, गजानन धोंडबा डाळ (बहुजन समाज पार्टी)- हत्ती, बाबुराव कदम कोहळीकर (शिवसेना)-धनुष्यबाण, विजय रामजी गाभणे (कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्ससिस्ट)-हातोडा, विळा आणि तारा, अनिल देवराव मोहिते (अखिल भारतीय परिवार पार्टी)-किटली, ड.अलताफ अहेमद (इंडियन नॅशनल लीग)-गॅस शेगडी, डॉ. बी. डी. चव्हाण (वंचित बहुजन आघाडी)- कपाट, देवसरकर वर्षा शिवाजीराव (बहुजन मुक्ती पार्टी)-खाट, देशा श्याम बंजारा (समनक जनता पार्टी)- जहाज, प्रकाश मेशराम रणवीर (रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया-ए)- शिवण यंत्र, रवी रामदास जाधव-सवनेकर (अभिनव भारत जनसेवा पक्ष)- शिट्टी, सुनिल दशरथ इंगोले (भीमसेना)- ऑटो रिक्षा, हेमंत राधाकिशन कनाके (राष्ट्रीय किसान बहुजन पार्टी)- रोड रोलर, त्रिशला मिलिंद कांबळे (बहुजन समाज पार्टी-आंबेडकर)- गॅस सिलेंडर, अशोक पांडुरंग राठोड (अपक्ष)-ईस्त्री, आनंद राजाराम धुळे (अपक्ष)-ऊस शेतकरी, अंबादास सुकाजी गाडे (अपक्ष)-फलंदाज, अ. कदिर मस्तान सय्यद (गोरेगावकर) (अपक्ष)-कॅमेरा, दत्ता श्रीकृष्ण सूर्यवंशी (अपक्ष)-चिमणी, देवजी गंगाराम आसोले (अपक्ष)-कढई, बाबुराव आनंदराव कदम (अपक्ष)-बॅटरी टार्च, भवर गोविंदराव फुलाजी (अपक्ष)-फुलकोबी, महेश कैलास नप्ते (अपक्ष)-ट्रक, ड. रवि शिंदे (अपक्ष)-दूरदर्शन, रामप्रसाद नारायण बांगर (अपक्ष)-टेबल, ड. रामराव आत्माराम जुंबडे (अपक्ष)-कोट, वसंत किसन पाईकराव (अपक्ष)-सफरचंद, विजय ज्ञानबा राऊत (अपक्ष)-जेवणाचे ताट, विश्वनाथ भाऊराव फाळेगावकर (अपक्ष)-लॅपटॉप, ड. शिवाजीराव जाधव (अपक्ष)-अंगठी, सत्तार पठाण (अपक्ष)-तुतारी, सर्जेराव निवृत्ती खंदारे (अपक्ष)-माईक आणि सुनिल मोतीराम गजभार (अपक्ष)-बॅट याप्रमाणे निवडणूक रिंगणात असलेल्या उमेदवारांची नावे, पक्ष व चिन्हे आहेत.

# बाबुराव कदम यांच्या प्रचार कार्यालयाचे थाटात उद्घाटन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**



हिंगोली लोकसभेचे वारे दिवसेंदिवस फिरत असल्याने आज सेनगाव येथे हिंगोली लोकसभा उमेदवार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन आज दिनांक १० एप्रिल रोजी सकाळी मोठ्या थाटामाटा मध्ये पार पडले व त्याचबरोबर हॉटेल सुरुची येथे महायुती कडून आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी शिवसेना (शिंदे गटचे) संपर्कप्रमुख आनंदरावजी जाधव ,हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे, मा खासदार शिवाजीराव माने, भाजपा प्रभारी रामदास पाटील सुंठाणकर ,शिवसेना ता प्रमुख रामप्रसाद घुगे, भाजप ता हिम्मत राठोड, भाजप जिल्हा अध्यक्ष फुलाजी शिंदे, राष्ट्रवादी (अजित दादा पवार गटाचे)ता अध्यक्ष विकासजी शिंदे, रिपाईचे बाबुराव इंगळे, शिवसेना शहर प्रमुख मधुकर देशमुख, शिवसेना रामेश्वर शिंदे युवा सेना शहर प्रमुख अमर तिडके, नागोराव फासाटे, भाजप नेते केके शिंदे पुरुषोत्तम गडदे सेनगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोकराव ठेंगल, शंकरराव बोरुडे अमोल खिल्लारी नगरसेवक अमोल तिडके, नगरसेवक दीपक फटांगळे, नगरसेवक श्रीराम देशमुख, नगरसेवक सतीश भाऊ खाडे, नगरसेवक आप्पासाहेब भाऊ देशमुख, बाळू अण्णा उफाड, अंकुश तिडके, मारोतराव काळबांडे, अक्षय देशमुख, वआदी कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते,

## अवैध रुक्ष तोडी कोणाच्या अशिर्वादाने सुरु ; अधिकारीही झोपेत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी । मलकापूर**



एकीकडे शासन 'झाडे लावा, झाडे जगवा' असा नारा देत आहे. मात्र मलकापूर तालुक्यात धरणगाव ते झोडगा जाणार्या रस्त्यावरील मोठमोठी तब्बल २८ झाडांची अवैधपणे कत्तल करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे एका पुढार्याच्या मध्यस्थीने एका मंदिराला देणगीच्या नावाखाली पावती फाडून हा सर्व प्रकारही घडला असल्याची चर्चा आहे. धरणगाव ते झोडगा या रस्त्याचे काम गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. या रस्ता कामावेळी रस्त्याने असलेली मोठमोठी झाडांची कत्तल करण्यात आली. शासन दरवर्षी वृक्ष लागवडीवर करोडो रूपये खर्ची घालते. तर दुसरीकडे अशाप्रकारे मोठमोठ्या झाडांची कत्तल होत असेलतर याला काय म्हणावे? असा प्रश्न निर्माण झाला आहे. धरणागव ते झोडगा जाणार्या रस्त्यावरील तब्बल २८ मोठमोठ्या झाडांची कत्तल करण्यात आली. ही झाडे तोडण्यापुर्वी कुठल्याही विभागाची परवानगी सुध्दा घेतली गेली नसल्याचे समजते. तर एका पुढार्याच्या मध्यस्थीने एका मंदिराला देणगी स्वरूपात पावती फाडण्यात येऊन हा सर्व वृक्ष कटाईचा कारनामा केला गेला असल्याची खमंग खर्चाही या परिसरात रंगली आहे. तेव्हा या वृक्षकटाईच्या गंभीर बाबीकडे संबंधित लक्ष देतील काय? आणि अवैधपणे केलेली वृक्षाची कटाई पाहता हे कृत्य करणार्यांवर कारवाई होईल काय? हे येत्या काळात स्पष्ट होईलच.

## चारोळी

**मनातलं विचारांच बीज**
**भुईत जोमानं रुजावं**
**तेजाळल्या दिशा शोधत**
**अंधाराला भेदून शब्दांकूर झेपवावं.**

रंजना सानप
मायणी (सातारा)

## पुण्यात यंदा भाजपला मोठा फटका

पुणे-राज्यात सध्या विविध पक्ष आणि नेत्यांची खिचडी झाली आहे. जनता यामुळे वैतागलेली आहे. वंचित बहुजन पक्षात मी चांगला मराठा उमेदवार असून, प्रकाश आंबेडकर यांनी माझ्या चेहऱ्याकडे पाहून नाही तर कामाकडे पाहून तिकीट दिले आहे, असा दावा पुण्यातील वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार वसंत मोरे यांनी बुधवारी पत्रकारांशी बोलताना केला. माझे सोशल मीडियावर ८.५ लाख फॉलोअर्स असून, यापैकी दीड लाख पुण्यातील रहिवासी आहेत. निवडणुकीत या सर्वांची मते मला मिळतील, असेही ते यावेळी म्हणाले.

## संपादकीय

# हळुवार स्पर्शाचे गुपित



लोकनेता न्यूज नेटवर्क

तान्ह्या बाळाला नुसत्या स्पर्शाने आईची ओळख पटते. अंध व्यक्ती स्पर्शाने वस्तू, माणसे ओळखतात; एवढेच नाही, तर ते ब्रेल लिपीतील अक्षर अन् अक्षर बोटांच्या सहाय्याने वाचतात. स्पर्शाचे आपल्या आयुष्यात अनन्यसाधारण महत्त्व आहे. दैनंदिन आयुष्यात आपण थंड, गरम, गुळगुळीत, खरखरीत, ओला, कोरडा असे असंख्य स्पर्श अनुभवतो. स्पर्श या मूळ संवेदातून मेंदू सभोवतालच्या वस्तू आणि बदलांची माहिती गोळा करतो. ही माहिती मेंदूला समजेल, अशा भाषेत म्हणजेच विद्युत रासायनिक संकेतांमध्ये रूपांतरित करण्याचे काम त्वचेतील चेतापेशींवरील विशिष्ट स्पर्शग्राही प्रथिने अर्थात संवेदक करतात. चेतापेशी हे संकेत पकडून, वर्धित करून मेंदूकडे धाडतात. मग मेंदू त्याचा अर्थ लावतो आणि आपल्याला स्पर्श ओळखू येतो. ही सर्व प्रक्रिया केवळ २५ ते ५० मिलिसेकंदात घडते.

काही मिलिसेकंदात घडणाऱ्या या प्रक्रियेमागील विविध स्पर्शग्राही रेणूंचा वैज्ञानिक मागील काही दशके शोध घेत आहेत. डॉ. जुलियस आणि डॉ. पॅटापुटियन यांनी सन २०१०मध्ये तापमान व दाबाची संवेदना पोहोचवणारे पिझो-१ आणि २ हे स्पर्शग्राही शोधून काढले. त्यांच्या या संशोधनकार्यासाठी त्यांना सन २०२१ मध्ये नोबेल पारितोषिकाने गौरवले गेले. वूलोंगॉन्ग विद्यापीठातील वैज्ञानिकांना अलीकडेच उंदराच्या चेतापेशींवर अभ्यास करताना एल्किन प्रथिन हाती लागले. त्वचेवर हलका दाब पडल्यास एल्किन प्रथिनांची उघडझाप होते व त्यांच्या संपर्कातील चेतापेशी उत्तेजित होऊन हळुवार स्पर्शाची संवेदना निर्माण होत असल्याचे त्यांना दिसले. जनुकीय अभियांत्रिकीच्या मदतीने त्यांनी काही उंदरामधील एल्किन जनुके निष्क्रिय केली. या उंदरांना कापसाच्या वातीचा हळुवार स्पर्श अजिबात जाणवत नव्हता; परंतु इतर सर्व स्पर्श त्यांना जाणवत असल्याचे दिसले. या प्रयोगामुळे एल्किन आणि हळुवार स्पर्श यांच्यातील संबंध स्पष्ट झाला. मानवी चेतापेशींमध्येही एल्किन जनुके निष्क्रिय केल्यानंतर विशिष्ट विद्युत संकेत कमी झाल्याचे दिसले व या निष्कर्षावर शिक्कामोर्तबच झाले.

हा शोध संशोधन म्हणून लक्षवेधी तर आहेच, पण हळुवार स्पर्श म्हणजे नक्की काय याचे उत्तरही त्याने दिले आहे!

# मतटक्का वाढीचे आव्हान

लोकनेता न्यूज नेटवर्क

लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीला गती येत असून, पुढील आठवड्यात १९ एप्रिल रोजी पहिल्या टप्प्यातील मतदान होईल. या निवडणुकीसाठी देशभरातून तब्बल ९६.८० कोटी मतदार मतदानास पात्र असतील. सन २०१४ आणि २०१९ या गेल्या दोन लोकसभा निवडणुकांत एकूण देशभरातील मतदानाचे प्रमाण आधीच्या निवडणुकांच्या तुलनेत वाढले होते. हे प्रमाण २०१९मध्ये ६७.४ टक्के होते, तर २०१४मध्ये ६६.४४ टक्के होते. मतटक्क्याचा आलेख चढता असला, तरी महाराष्ट्र, उत्तर प्रदेश बिहार या मोठ्या राज्यांसह देशातील ११ राज्यांतील मतदानाचे प्रमाण राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे. त्यांमधील मतदानाचे प्रमाण वाढविण्याबरोबरच एकूण देशातील मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहन देण्यासाठी निवडणूक आयोगाने कंबर कसल्याचे दिसते.मतदारांत जागरुकता निर्माण करण्यापासून मतदान केंद्रांपर्यंत सार्वजनिक वाहतूक सुविधा आणि स्वच्छतेची व्यवस्था करण्यापर्यंत अनेक उपाययोजना करण्याचे आयोगाने जाहीर केले आहे. आयोगाचे हे पाऊल स्वागतार्ह असून, त्याला समाजातील सर्व सुजाण घटकांनी बळ देण्याची आवश्यकता आहे. लोकशाहीत हक्क आणि कर्तव्य यांचा उल्लेख सातत्याने होतो. मतदान हा हक्क आहे; अन् ते कर्तव्यही आहे. आपल्याला हवे ते सरकार निवडून देण्याची संधी याद्वारे मिळत असते. माझ्या एका मताने काय फरक पडतो, असा नकारात्मक विचार न करता प्रत्येक पात्र मतदाराने मतदान करायला हवे. महाराष्ट्रातील मतदान राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी असणे हे या राज्याच्या पुरोगामी प्रतिमेला शोभणारे नाही. सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या जागरूक आणि संवेदनशील असलेल्या महाराष्ट्रातील मतटक्का अन्य राज्यांपेक्षा कमी का राहतो, याचा विचार प्रत्येकाने करायला हवा. स्वातंत्र्यपूर्व काळात ज्या पुण्यात राष्ट्रीय राजकारणाला गती देणारे नेते होते, त्याच पुण्यातील मतदान पन्नास टक्क्यांहून कमी असणे ही चिंताजनक बाब आहे. पुण्याखेरीज कल्याण आणि ठाणे या मतदारसंघांतील मतदानही गेल्या वेळी पन्नास टक्क्यांच्या खाली होते.मुंबईतील दक्षिण, उत्तर मध्य, वायव्य, तसेच भिवंडी येथील मतदान पन्नास टक्क्यांहून किंचितच अधिक आहे. मुंबई-पुणे या महानगरांमधील मतदानाचे कमी असलेले प्रमाण शहरी मतदारांचा अनुत्साह अधोरेखित करणारे आहे. एरव्ही विविध विषयांवर जोरकसपणे भूमिका मांडणारे शहरी नागरिक मतदानाच्या बाबतीत मागे का, हा खरा प्रश्न आहे. त्यांच्यात मतदानाबद्दलचा उत्साह वाढविण्यासाठी निवडणूक आयोगाबरोबरच विविध सामाजिक संघटनांनीही पुढाकार घ्यायला हवा. लोकशाहीच्या या सर्वांत मोठ्या उत्सवात प्रत्येक मतदाराने सहभागी होऊन आपले कर्तव्य बजावायलाच हवे.

# उपमुख्यमंत्री फडणवीस महाराष्ट्राच्या राजकारणातील 'आधुनिक चाणक्य'

लोकनेता न्यूज नेटवर्क

महाराष्ट्राच्या राजकारणातील हुकमी एक्का म्हणजेच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये अर्धशतकापेक्षा जास्त काळ गाजविणाऱ्या व राज्याचे मुख्यमंत्रीपद व केंद्रीय कृषिमंत्री पद सांभाळणाऱ्या शरद पवार यांना थेट आव्हान देण्याचे आव्हानात्मक धाडस केवळ देवेंद्र फडणवीसच करू शकतात. त्यामुळे राज्यातील राजकारणामध्ये सध्या त्यांन ' आधुनिक चाणक्य ' असे म्हटले जात आहे. भारतीय जनता पक्षामध्ये विविध पक्षातील नेत्यांना आणण्याची किमया देवेंद्र फडणवीस करत असल्यामुळे भारतीय जनता पक्षाचा जनाधार व्यापक पद्धतीने पसरविण्याचे काम महाराष्ट्रात वेगाने झाले आहे. पक्षांमध्ये जुन्या व नव्या नेत्यांना अतिशय चांगल्या पद्धतीने हाताळण्याची किमया त्यांनी केलेली आहे. त्यांच्यावर केंद्रीय नेतृत्वाचा विश्वास आहे . विशेषतः देशाचे पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी व देशाचे गृहमंत्री अमितभाई शहा, पक्षाध्यक्ष नड्डाजी यांचा राजकीय विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या मुत्सद्दी राजकारणामुळे व विरोधकावर टाकलेल्या डावामुळे सार्थ करून दाखविला आहे. महाराष्ट्रात मागील दीड वर्षांपूर्वी झालेले सत्तांतर हा त्यांच्या मुत्सद्दी राजकारणाचा परिपाक असल्याचे



बोलले जाते. शिवसेना पक्षांमध्ये उभी फूट पाडून ते त्यांचे ४० पेक्षा जास्त आमदार फोडण्याचे काम त्यांनी अतिशय धूर्त पद्धतीने केले. त्याबरोबरच राष्ट्रवादी पक्षामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली आमदारांचा गट फोडून शरद पवार यांच्या राजकारणाला सुरुंग लावण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्यामुळे शरद पवार, उद्धव ठाकरे हताश झाले. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेमध्ये बोटावर मोजण्याइतके आमदार उरले. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या गटातील अनेक शिवसेनेचे नेते शिंदे गटांमध्ये पक्षांतर करत असल्यामुळे शिवसेना खिळखिळी होत आहे. महाराष्ट्र मध्ये महायुतीचा राज्यकारभार यशस्वीपणे करण्याची किमया देवेंद्र फडणवीस अतिशय चांगल्या पद्धतीने करत आहेत. त्यांची प्रशासनावर पकड मजबूत असल्यामुळे आयएएस अधिकारी सुद्धा त्यांच्यासमोर कोणतीही फाईल ठेवताना अत्यंत अभ्यासपूर्वक पद्धतीने ठेवतात असे मंत्रालयात बोलले जाते. मंत्रालयात आमदारांच्या विविध विकास कामाच्या प्रलंबित फाईली योग्य पद्धतीने तपासून कामे मार्गी लावण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांना मदत करण्याच्या दृष्टीने, वेगवान व पारदर्शक प्रशासन करण्यासाठी उपमुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे त्यामुळे त्यांना राजकारणातील 'आधुनिक चाणक्य ' म्हटले जात आहे. पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ मुंबई व कोकण या सगळ्याच प्रादेशिक भागांमध्ये भाजपाची पाळेमुळे, संघटनात्मक विस्तार, ग्रामीण भागापर्यंत विस्तारण्यासाठी व पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी विविध पक्षातील नेत्यांना भाजपामध्ये आणून त्यांच्यावर मोठी जबाबदारी टाकून भाजपाचे संघटनात्मक काम मजबूत करण्यासाठी त्यांनी विविध नवीन योजना आखलेल्या असल्यामुळे पक्षाचा बेस महाराष्ट्रात मजबूत होत आहे. महाराष्ट्रात ४८ पैकी ४५ खासदार देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली निवडून आणण्याची जबाबदारी देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःच्या ताकदीवर स्वीकारलेली असल्यामुळे ही लोकसभा निवडणूक त्यांच्यासाठी गेम चेंजर ठरणारी आहे.

# सरपटत येणारे संकट

लोकनेता न्यूज नेटवर्क

कोणत्याही संकटाची तीव्रता कमी करायची असेल तर त्यासाठी निवडणुकीइतकी प्रभावी मात्रा दुसरी नसते. सध्या महाराष्ट्रात तसेच दिसते. राज्यातील सत्ताधारी महायुती, विरोधी महाआघाडी यांच्यातील सुंदोपसुंदीच्या गदारोळात राज्यकर्ते आणि प्रशासन यांच्या गावीच दुष्काळ नाही.

काही धोरणात्मक निर्णय, थातूरमातूर उपाययोजना, केंद्राकडे पाठपुरावा यापलीकडे काहीही घडलेले नाही. लोकसभेची आचारसंहिता लागण्यापूर्वीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकांमधून मतदारांवर प्रभाव टाकणारे डझनावारी निर्णय घेतले, परंतु त्यात दुष्कळी उपाययोजना नव्हत्या.

परिणामी, दुष्काळाचे संकट त्याच्या गतीने पुढे सरकतच आहे. दुष्काळावर उपाययोजनांसाठी प्रशासकीय यंत्रणेने कंबर कसून कामाला लागले पाहिजे. एप्रिलचे तीन आठवडे, संपूर्ण मे आणि पावसाने ओढ दिल्यास जून महिना असा मोठा कालावधी पाणीप्रश्न, दुष्काळामुळे बिकट असेल.

निवडणुका पार पडतीलच, परंतु दुष्काळाचा सामना करण्यासाठी कोण बळ देणार, हा प्रश्न आहे. यंदा मान्सून जेमतेम बरसला, आशा असलेला परतीचा पाऊसही नेहमीसारखा कोसळला नाही. देशभरातच पावसाची तूट, महाराष्ट्रात फारच कठीण स्थिती आहे. ऑगस्ट वगळता राज्यात समाधानकारक पाऊस झालाच नाही. यंदा सरासरीपेक्षा ११.४टक्के पाऊस कमी झाल्यामुळे मार्चपासूनच अनेक भागांत पाणीटंचाईची ओरड आणि टँकरची घरघर आहे. त्याची तीव्रता वाढणार आहे.

कोणतेही सरकार दुष्काळ जाहीर करायला टाळाटाळ करीत असते. दुष्काळाचा दाह सामान्यांच्या तोंडचे पाणी पळवू लागला तरी तो सरकारी निकषांच्या चौकटीत बसतच नाही. जानेवारी-फेब्रुवारीमध्ये टंचाई आराखड्यांची मागणी तीव्र होते.

टँकर, चाऱ्याची मागणी वाढली, लोकभावना तीव्र झाल्या की, टंचाईग्रस्त स्थिती, दुष्काळसदृश्य स्थिती, दुष्काळी परिस्थिती असे शाब्दिक खेळ सुरू होतात. यंदा महाराष्ट्रात राजकीय धुळवड इतकी टिपेला




गेली की,

सामान्यांनाही दुष्काळाचे संकट दाराशी आलंय, याचे भान नव्हते. मग जागावाटपाच्या बैठकांमध्ये, एकमेकांवर मात करण्यात व्यग्र राजकारण्यांना दुष्काळाची जाणीव होण्याचे कारणच नाही. तर प्रशासन निवडणूक कामात गुंतल्याने दुष्काळाला तोंड कसे द्यायचे, हा प्रश्नच आहे.

धरणांतील घटता पाणीसाठा हा महत्त्वाचा व कळीचा मुद्दा. त्या पातळीवर विदर्भ आणि कोकण वगळता उर्वरित महाराष्ट्रातील परिस्थिती गंभीर आहे. याचा अर्थ तेथील स्थिती समाधानकारक आहे असा नव्हे; तर गेल्यावर्षीच्या तुलनेत ठिकठाक आहे.

मराठवाड्यांतील धरणांमध्ये गेल्यावर्षी याच कालावधीत ४४.६८ टक्के पाणीसाठा होता, तो सध्या १८.३१टक्क्यांवर घसरला, यावरून मेमधील स्थितीची कल्पनाच न केलेली बरी! नाशिकमध्ये हा पाणीसाठा ५१वरून ३७, पुणे विभागात ४५वरून ३४ टक्क्यांवर पोचला आहे.

दुष्काळी परिस्थितीमध्ये विशेषतः ग्रामीण भागात टँकरने पाणी पुरवावे लागते. दुष्काळाचे गांभीर्य मोजण्याचे ते दृश्य परिमाण. गतवर्षीच्या परिस्थितीवर नजर टाकली तर दिसते की, राज्यभरात ५९ गावे आणि १८०वाड्यांना ६८ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू होता. आजमितीला राज्यात एक हजार४५२ गावे आणि तीन हजार३०१ वाड्यांना एक हजार८५८ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. गतवर्षीच्या तुलनेत टँकरद्वारे पाणीपुरवठ्याच्या गावांची संख्या पंचवीस पट, वाड्यांची संख्या अठरा पट आणि टँकरची संख्या सत्तावीस पट आहे. पैकी निम्मे टँकर मराठवाड्यात आणि नाशिक व पुणे विभागात प्रत्येकी सुमारे चारशे टँकरद्वारे पुरवठा होतो. यावरून भविष्यात पाणीप्रश्न जीवघेणा होऊ शकते, असे दिसते. आताच पाण्यावरून हाणामाऱ्यांचे प्रसंग घडत आहेत. सांगली जिल्ह्यात अलीकडेच काँग्रेसने पाणीप्रश्नी मोर्चा काढला. पाण्याचे राजकारण केले जाते. कोयना, वारणा धरणातील पाण्यासाठी सांगलीला याचना करावी लागत असल्याचा आरोप मोर्चाद्वारे करण्यात आला.

ऐन निवडणुकीत असे प्रश्न हाताळणे प्रशासनासाठीही आव्हानात्मक आहे. गेली दोन-अडीच वर्षे स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार प्रशासकीय अंमलाखालीच असल्याने त्यांनाच नागरिकांच्या रोषाचा सामना करावा लागत आहे.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने उपलब्ध पाणी आणि त्याचा पुरवठा यांचे नियोजन, बेबंदपणे पाणीवापराला आळा, प्रसंगी काही दिवसांतून एकदा पुरेसा पाणीपुरवठा असे उपाय स्थानिक स्थितीनुसार केल्यास प्रश्नाची तीव्रता कमी होईल. सरासरीपेक्षा कमी पावसामुळे अनेक ठिकाणी गुरांसाठी चाऱ्याची टंचाई आहे. परिणामी, दुधाचा पुरवठाही विस्कळीत होऊ शकतो. त्यामुळे चारावाटप, जनावरांसाठी चाराछावण्या अशाही उपाययोजनांचा विचार करून कृती करावी.

कडाडणारा भाजीपाला, शेतमाल हा शेतकरी आणि ग्राहक या दोघांच्याही जिव्हाळ्याचा विषय आहे. परिस्थितीची तोशीस दोघांनाही लागते. त्यामुळेच पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे काटेकोर नियोजन, औद्योगिक, शेती, पिण्यासाठी याबाबत पाण्याची उपलब्धता आणि गरज यांचा मेळ घालणे अशा कितीतरी आघाड्यांवर प्रशासनाने समग्र आढावा घेऊन उपाययोजना कराव्यात. तरच दुष्काळ, पाणीटंचाईने होरपळणाऱ्या महाराष्ट्राला दिलासा मिळेल. दिवसेंदिवस दुष्काळाचे संकट गहिरे होत आहे. खेड्यापाड्यांच्या घशाची कोरड वाढत आहे, पाण्यावरून हमरीतुमरी सुरू आहे. निवडणूक कामात गुंतलेल्या प्रशासनाने आणि राज्यकर्त्यांनी उपाययोजनांकडे लक्ष द्यावे.

# तापमानवाढीमुळे अन्न महाग

लोकनेता न्यूज नेटवर्क

जागतिक तापमानवाढीचे परिणाम सर्वच स्तरांवर होत असतात. तापमानवाढीमुळे एका दशकाच्या आतच अन्नधान्याची महागाई दरवर्षी ३.२ टक्क्यांनी वाढत जाऊन अर्थव्यवस्थांना झळ बसू शकते, असा धोक्याचा इशारा एका ताज्या अभ्यासात देण्यात आला आहे. याचा फटका अर्थातच, श्रीमंत देशांपेक्षा दक्षिण गोलार्धातील गरीब देशांना अधिक बसू शकतो, असेही आंतरराष्ट्रीय स्तरावरील या अभ्यासात नमूद करण्यात आले आहे.

जर्मनीतील पोट्सडॅम इन्स्टिट्यूट फॉर क्लायमेट इम्पॅक्ट रिसर्च या संस्थेतील अभ्यासकांचा समावेश असलेल्या पथकाने सन २०३५मध्ये जगभरातील जे तापमान असेल त्याचा विचार करता, एकूण महागाई ०.३ ते १.२ टक्क्यांनी वाढू शकते, असा अंदाजही वर्तवला आहे. तापमानवाढीमुळे वाढलेली महागाई विषुववृत्ताच्या जवळ असलेल्या देशांमध्ये संपूर्ण वर्षभर, तर ध्रुवांजवळील देशांमध्ये केवळ उन्हाळ्याच्या मोसमात नोंदवली जाऊ शकते. 'कम्युनिकेशन्स अर्थ अँड एनव्हायर्नमेंट' या विज्ञानपत्रिकेत प्रसिद्ध झालेल्या या अभ्यासानुसार, सन २०२२च्या उन्हाळ्यात युरोपात अन्नधान्याची महागाई ०.६७ टक्क्यांनी वाढली होती. २०३५मधील अंदाजित तापमान लक्षात घेता हे प्रमाण ३० ते ५० टक्क्यांपर्यंत जाऊ शकते, असे यात नोंदवण्यात आले आहे.

या अभ्यासासाठी संशोधकांच्या पथकाने जगभरातील १२१ देशांचे सन १९९१ ते २०२० या कालावधीतील राष्ट्रीय ग्राहक किंमत निर्देशांक




(सीपीआय) आणि हवामानाची माहिती यांचे विश्लेषण केले. हवामानाच्या मॉडेलआधारे सन २०३० ते २०६० या कालावधीत महागाईवर काय परिणाम होऊ शकतो, याचा अंदाज अभ्यासकांनी मांडला.आफ्रिका आणि दक्षिण अमेरिकेतील देशांना याची मोठी झळ बसू शकते. मात्र आग्नेय आशियातील देशांची तपशीलवार माहिती उपलब्ध नसल्याने तापमानवाढ आणि महागाईच्या परस्परसंबंधांचे विश्लेषण करणे शक्य झाले नाही, असे अभ्यासकांनी नोंदवले. हरित गृह वायूंच्या उत्सर्जनावर नियंत्रण मिळवण्यासाठीच्या उपाययोजना आणि तंत्रज्ञानाचा वापर याआधारे अर्थव्यवस्थेला असलेला हा धोका कमी करता येऊ शकतो, ही बाब लक्षात घ्यायला हवी. त्यानुसार पावले टाकल्यास दिलासा मिळू शकेल.

# कंधार तालुक्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचे थैमान

## टोमॅटो,हळद,ज्वारी पिकांसह आंब्याचे प्रचंड नुकसान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

गुढी पाडव्याच्या दिवशीच शेतकऱ्याला निसर्गाने झोडपून काढले.दि.९ एप्रिल रोज मंगळवारी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास अचानक विजांच्या कडकडाटासह वादळी वाऱ्याने अवकाळी पावसाला सुरुवात होवून अक्षरशः थैमान घातले.कंधार तालुक्यांतील फुलवळ,बहाद्दरपुरा, मानसपुरी, घोडज, शेकापूर, फुलवळ, आंबूलगा, सोमासवाडी, मुंडेवाडी, कंधारेवाडी, पानशेवडी, गऊळ, जंगमवाडी, वाखरड, शेकापूर, तळ्याचीवाडी, संगमवाडी आदी परिसरात अचानक सुरुवात झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसामुळे हळद,उन्हाळी ज्वारी,भुईमूग,व हळद शिजवून सुकवण्यासाठी टाकलेल्या हळदीसह अन्य पिकांबरोबरच आंब्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.

सध्या सर्वत्र हळद काढणे, ज्वारी काढणे,राशी करणे ही शेतकऱ्यांची कामे मोठ्या प्रमाणात सुरू आसून कापलेल्या गव्हाचे काड,व ज्वारी पिक काढून शेतात उघड्यावरच असल्याने अचानक



आलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांची तारांबळ उडून पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अवकाळी पावसाने झोडपल्यामुळे शेती पिकांचे तर नुकसान झालेच असून वादळी वाऱ्यामुळे उभे असलेले ज्वारी पीक चक्क आडवे होऊन त्यांचेही नुकसान झाले आहे तर सध्या झाडांना लगडलेली कैरीसारखी आंबे गळून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच शेतीकामासाठी शेतात असलेल्या हळद उत्पादक शेतकरी व कामगारांची चांगलीच तारांबळ उडाली. तसेच शेतात असलेल्या मुक्या जनावरांचे ही मोठ्या प्रमाणावर हाल झाले. अचानक आलेल्या पावसामुळे शेती पिकांचे झालेले नुकसान पाहून तोंडचा घास या अवकाळी पावसाने हिरावला असल्याच्या भावना व्यक्त करत वर्षभर राबराब राबून, मेहनत, काबाडकष्ट करून ज्याच्यावर आशेची शिदोरी असते तेव निसर्गाने आमच्याकडून हिरावून घेतले. तेंव्हा संसाराचा गाडा हाकावा तरी कसा अशाही भावना शेतकऱ्यांकडून ऐकावयास मिळत असून या पावसामुळे नुकसान झालेल्या शेती पिकांचे प्रशासनाच्या वतीने पंचनामे करून हवालदिल झालेल्या बळीराजाला मदतीचा हात मिळेल का? असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.हळद उत्पादक शेतकरी व वीट उत्पादक यांची या अवकाळी पावसामुळे चांगलीच तारांबळ उडाल्याचे दिसून येत होते,या वादळी वाऱ्यासह मेघगर्जनेसह कोसळणाऱ्या पावसामध्ये प्रचंड विजांच्या कडकडाट ऐकू येत असल्याने व विजांचा लख्ख प्रकाश चमकत असल्याने शेतात काम करत असलेले महिला व पुरुष सरळ घराचा रस्ता धरून गावाकडे पळत येत असल्याचे दिसून येत होते.

### वीज पडून तीन जनावरे दगावली

कंधार तालुक्यातील घागरदरा येथील शेतकरी विठ्ठल धोंडीबा गडंबे यांच्या शेतामध्ये वीज कोसळली.त्यात दोन गायींचा मृत्यू झाला.तर पानभोसी येथे शेख शादुल युसुबसाब यांचा बैल वीज अंगावर पडल्याने दगावल्याची घटना घडली आहे.

# बेल्हे येथे आढळला बर्फाच्या लादी मध्ये मेलेला उंदीर

## सरबत,ज्यूस,उसाचा रस,गोळे ,खाताय सावधान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मयूर ढोबळे । जुन्नर**

बेल्हे, येथील एक सरबत, ज्यूस व बर्फाचे गोळे बनवणारा व्यवसायिक राजेश निषाद यांनी आणलेल्या बर्फाच्या लादी मध्ये मेलेला उंदीर सापडला असतानाही त्यांनी तोच बर्फ इतर व्यवसायिकांना विकल्याची धक्कादायक घटना बेल्हे येथे घडली असून सदर मेलेल्या उंदरामुळे उसाचा रस, बर्फाचा गोळा, बर्फाचा लिंबू सरबत इत्यादी पिण्यामुळे लहान मुले व प्रवाशांना त्रास झाल्यास त्याला जबाबदार कोण ? बर्फ बनविणाऱ्या कारखान्यामध्ये होत असलेला हलगर्जीपणा किंवा राजेश निषाद यांनी आणलेला बर्फ साठवून ठेवलेल्या ठिकाणी नसलेली स्वच्छता व त्या ठिकाणी असलेला उंदीर-घुशी यांचा वावर यामुळे त्या बर्फाच्या लादीत उंदीर जाण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे असतानाही सदर बर्फ विकण्याचे काम चालू होते, व्यवसाय करताना स्वच्छता असणे गरजेचे आहे, परंतु या बर्फ विक्रेत्यावर कोणाचाही अंकुश नसल्याने लहान मुलांना यापासून काही अपाय झाल्यास याला जबाबदार कोण?

उन्हाळा अतिशय कडक असल्याने दुचाकी किंवा चारचाकीमधून प्रवास करताना घशाला सारखी कोरड पडत असते, पर्यायाने रस्त्याच्या कडेला असणारे लिंबू पाणी, सरबत, नीरा स्टाल, उसाचा रस लक्ष वेधून घेतात व एकाच वेळी दोनदोन ग्लास रीचवून आपण पुढच्या प्रवासाला



निघतो पण लिंबू पाण्यातले व सरबताचे पाणी कशाचे आहे, कोठून आणले आहे, त्यात साखरच आहे का किंवा त्यात सक्रीनसारखा पदार्थ मिसळला आहे, तसेच बर्फ बनविताना वापरलेले पाणी शुद्ध होते का ? बर्फ साठविण्याची जागा चांगली आहे का? त्याठिकाणी मोकाट कुत्री, डुकरे येऊन बसतात का ? लिंबू पाणी किंवा सरबत बनविणा-याच्या हाताला काही जखमा झालेल्या आहेत का ? त्यापासून आपल्याला व बरोबर असणाऱ्या लहान बालकांना काही संसर्ग होईल का ? यापैकी एकाही गोष्टींचा आपण विचार न करता डोळे झाकून पिऊन टाकता, याविषयी संबधित खात्याने लक्ष घालणे गरजेचे आहे आणि जनतेच्या आरोग्याशी खेळण्याचा अधिकार यांना कोणी दिला, तेंव्हा रस्त्यावरील लिंबू पाणी, बर्फ घातलेला उसाचा रस,आकर्षक बाटल्यामधील सरबत व नीरा पिताय पण सावधान जरा जपूनच, कारण आपले आरोग्य आपणच सांभाळले पाहिजे.

# सेनगाव मातंग समाजातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची महत्त्वपुर्ण बैठक संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

सेनगाव तालुक्यातील सर्व डॉ.अण्णाभाऊ साठे क्रांती सेना (-इड) क्रांती फोर्स संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय सचिन भाऊ साठे यांच्या आदेशाने लोकसभा निवडणूक अनुषंगाने व विविध क्षेत्रातील समाजभूषण पुरस्कार प्राप्त व्यक्ती यांचा सत्कार करण्यात आला व इतर संघटनेतील कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी संघटनेमध्ये प्रवेश केला असून तालुक्यातील काही महत्त्वाच्या पद नियुक्त्या करण्यात आल्या. या सर्व विषयाच्या अनुषंगाने दिनांक १० एप्रिल २०२४ रोजी शेनगाव येथे संघटनेचे नेते भागवत डोंगरे कडोळीकर यांच्या अध्यक्षतेखाली शिवसेना (ठाकरे गटाच्या) कार्यालय येथे महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते या बैठकीला उपस्थित समाज भुषण नेते संजय जामठीकर अ भा मातंग सघ जिल्हा अध्यक्ष सोपानराव रनबावळे जिल्हाप्रमुख नामदेवराव मानमोठे, शहर जिल्हाप्रमुख नाथा भाऊ रणबावळे, एडवोकेट तथा उपसरपंच दिपक रनबावळे, एडवोकेट तथा उपसरपंच, मधुकर कांबळे, जिल्हाध्यक्ष नामदेव भाऊ मनमोठे, जिल्हाध्यक्ष शहरी नाथाभाऊ रणबावळे, जिल्हा स्टार



प्रचारक मधुकर सुतार, जिल्हा सचिव तथा सरपंच सुनील घनगाव, सो. रेखाताई घनगाव जिल्हाध्यक्ष महिला आघाडी, संगीता ताई खंदारे तालुका अध्यक्ष, पत्रकार मोहन कांबळे, ब्रह्माजी हलवते, तालुका अध्यक्ष संजू भाऊ हनवते, युवा तालुका अध्यक्ष रविभाऊ गोरेगावकर, विलास भाऊ सुतार, भैय्यासाहेब जाधव, श्रीकिसन सोनुने अश्रोबाजी घनघाव गजानन कांबळे, समाधान जाधव,पंडितराव कांबळे, तालुका उपाध्यक्ष भागवत बोरकर , दत्तराव कांबळे, योगेश कांबळे आणि डॉ.अण्णाभाऊ साठे क्रांती सेना संघटनेचे पदाधिकारी,, व तालुक्यातील विविध संघटनेचे पदाधिकारी तथा विविध पक्ष्यातील पदाधिकारी , व समाजातील नामांकित व्यक्ती उपस्थित होते. या बैठकीमध्ये सर्वांनी आदरणीय सचिन भाऊ साठे यांच्या आदेशाने हिंगोली लोकसभेमध्ये हिंगोली लोकसभेचे उमेदवार माननीय नागेश भाऊ अष्टीकर यांचे भागवत डोंगरे कडोळीकर यांच्या नेतृत्वात काम करून अष्टीकर यांना यांना प्रचंड बहुमताने निवडून आणण्याचे एकमताने ठरले. व अष्टीकर यांच्या प्रचारासाठी आदरणीय सचिन भाऊ साठे यांची भव्य सभा हिंगोली येथे घेण्याचे ठरविण्यात आली. बैठकीचे सूत्रसंचालन मधुकर सुतार यांनी केले तर आभार नामदेव मनमोठे यांनी मानले. विशेषतः बैठकीमध्ये अखिल भारतीय मातंग संघ जिल्हा शाखा हिंगोली जिल्हा अध्यक्ष सोपानराव रणबावळे यांनी आदरणीय सचिन भाऊ साठे यांना संघटनेच्या वतीने भक्कमपणे पाठिंबा जाहीर केला.

# बबनराव धायतोंडे उत्कृष्ट पत्रकार म्हणून भिम गौरव पुरस्काराने सन्मानित

## आमदार राहुल कुल यांच्या हस्ते केला सन्मान





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमित्त दौंड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती व महाराष्ट्र माथाडी आणि जनरल कामगार सेना तसेच ई- वेस्ट मॅनेजमेंट यांच्या विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे संयुक्त जयंती उत्सव २०२४ भिम गौरव पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला होता.

तसेच सिमा पाटील यांचा लावण्या कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. विविध सामाजिक,राजकीय,शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला त्यामध्ये धडाडीचे निर्भिड पत्रकार बबनराव धायतोंडे यांना उत्कृष्ट पत्रकार म्हणून दौंड तालुक्याचे आमदार राहुल कुल यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले.त्यांच्या या निवडीमुळे दौंड परिसरातुन त्यांचे कौतुक होत आहे.

यावेळी आमदार राहुल कुल, माजी आमदार रमेश थोरात,विरधवल जगदाळे,जयंती उत्सव समितीचे अनिल साळवे,आनंद बगाडे,अध्यक्ष दिलीप पगारे, अमोल काळे,योगेश कटारिया,बादशाभाई शेख,माजी नगरसेवक गौतम साळवे भीम जयंती उत्सव समितीचे तरुण कार्यकर्ते आणि शहरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आचारसंहितेचे पालन करताना जाणून घ्या ‘काय करावे’ आणि ‘काय करू नये’

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका २०२४ जाहीर होऊन प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. न्याय्य आणि नि:पक्षपाती वातावरणात निवडणुका पार पडाव्यात यासाठी भारत निवडणूक आयोगाने काही नियम ठरवून दिले आहेत. या नियमांनाच ‘आचारसंहिता’ म्हटले जाते. निवडणूक घोषित झाल्यापासून सर्वच राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी या आचारसंहितेचे पालन करणे अनिवार्य असल्याची माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांनी दिली आहे.

आचारसंहिता अधिक विस्तृत असल्याने त्यापैकी निवडणूक काळात राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी ‘काय करावे’ आणि ‘काय करू नये’ याबाबत काही महत्त्वाची तत्वे सांगितलेली आहेत. जाणून घेऊया याबाबतची माहिती.

**काय करावे?**

निवडणूक घोषित होण्यापूर्वी सुरू करण्यात आलेले कार्यक्रम पुढे सुरू ठेवता येतील. पूर, अवर्षण इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे प्रभावित झालेल्या क्षेत्रातील जनतेसाठी मदतीचे कार्य सुरू ठेवता येईल. मरणासन्न किंवा गंभीररित्या आजारी असलेल्या व्यक्तींना रोख रकमेची किंवा इतर वैद्यकीय मदत देता येईल. इतर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांच्यावरील टीका ही त्यांची धोरणे, पूर्वीची कामगिरी आणि कार्य यांच्याशीच संबंधित असावी. स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना प्रस्तावित सभांची जागा आणि वेळ याबाबत पुरेशी आगाऊ सूचना देऊन आवश्यक ती परवानगी घेतलेली असावी. प्रस्तावित सभेसाठी ध्वनिवर्धक किंवा इतर सुविधांचा वापर करण्याची परवानगी मिळवावी आणि ते वापरण्याच्या नियमांचे पालन करावे. सभांमध्ये अडथळे आणणाऱ्या, सुव्यवस्था बिघडवणाऱ्या व्यक्तींचा बंदोबस्त करण्यासाठी पोलिसांची मदत घेण्यात यावी. मिरवणूक सुरू होण्याची तसेच संपण्याची वेळ व जागा आणि ती जिथून जाणार असेल तो मार्ग अगोदर निश्चित करून पोलीस प्राधिकाऱ्यांकडून त्यासाठी आगाऊ परवानगी घेण्यात यावी. सर्व कार्यकर्त्यांनी बिल्ले व ओळखपत्र ठळकपणे लावावेत आणि मतदारांना पुरविण्यात येणाऱ्या अनौपचारिक ओळखचिठ्ठया साध्या (पांढऱ्या) कागदावर असाव्यात आणि त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे नाव किंवा पक्षाचे नाव असू नये.

**काय करू नये?**

निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे पालन करताना राजकीय पक्ष तसेच उमेदवारांना सत्ताधारी पक्ष / शासन यांनी केलेल्या कामगिरीविषयी सरकारी राज्यकोषातील खर्चाने कोणतीही जाहिरात करण्यास प्रतिबंध आहे. उमेदवार आणि मतदानासाठी आलेला मतदार यांच्याशिवाय इतर कोणाही मंत्र्याला मतदान कक्षात किंवा मतमोजणीच्या जागी प्रवेश करता येणार नाही. शासकीय काम आणि निवडणूक मोहीम/ निवडणूक प्रचार यांची सरमिसळ करू नये. इतर पक्षांचे नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक जीवनाशी संबंधित नसलेल्या खाजगी आयुष्याच्या कोणत्याही पैलूवर टीका करू नये. वेगवेगळ्या जाती, समूह आणि धार्मिक किंवा भाषिक गट यांच्यामधील विद्यमान मतभेद वाढतील किंवा परस्पर द्वेष, तणाव निर्माण होईल अशी कोणतीही कृती करू नये. सर्व धर्मिय प्रार्थनास्थळ यांचा वापर निवडणूक प्रचाराची भाषणे, भित्तीपत्रके, संगीत यांच्यासाठी करू नये. मतदारांना लाच देणे, दारुचे वाटप करणे, मतदारांवर गैरवाजवी दडपण वा धाकदपटशा दाखविणे, तोतयेगिरी, मतदान केंद्रापासून १०० मीटरच्या आत प्रचार करणे, मतदान समाप्त करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेच्या आधीच्या ४८ तासांत सार्वजनिक सभा घेणे आणि मतदारांची मतदान केंद्रावर ने-आण करण्यासाठी वाहनाची व्यवस्था करणे यांसारख्या गोष्टींना मनाई आहे. इतर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांनी आयोजित केलेल्या सार्वजनिक सभा किंवा मिरवणुका यांच्यामध्ये कोणताही अडथळा निर्माण करू नये. तसेच त्यामुळे वाहतुकीलाही अडथळा निर्माण करू नये. ज्या ठिकाणी इतर पक्षांच्या सभा घेतल्या जात असतील अशा ठिकाणांहून मिरवणूक नेऊ नये. इतर पक्षांनी व उमेदवारांनी लावलेली भित्तीपत्रके काढून टाकू नयेत अथवा विद्रुप करू नयेत. याचबरोबर मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्ठ्या वाटपाच्या ठिकाणी किंवा मतदान कक्षाजवळ भित्तीपत्रके, ध्वज, चिन्हे आणि इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करू नये.

आचारसंहितेच्या या तत्त्वांचा भंग झाल्याचे नागरिकांना आढळल्यास त्यांनी सी-व्हिजील पवर ध्वनीमुद्रण, ध्वनीचित्रमुद्रण या माध्यमातून तक्रार करावी, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

बी.सी.झंवर/विसंअ/

# सर्व पथकांनी उमेदवारांच्या निवडणूक खर्चाच्या अचूक नोंदी ठेवाव्यात-अन्वर अली



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । सय्यद रहीम रजा**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूक पारदर्शक व भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक विषयक सर्व बाबींवर बारकाईने लक्ष ठेवून खर्चाच्या अचूक नोंदी ठेवण्याच्या सूचना निवडणूक निरीक्षक (खर्च) अन्वर अली यांनी आज कळमनुरी येथील भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम सभागृह येथे आढावा बैठकीत दिल्या. हिंगोली लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आज निवडणूक खर्च निरीक्षक अन्वर अली यांनी आढावा घेतला. निवडणूक कालावधीमध्ये तक्रार असल्यास निरीक्षक अन्वर अली यांच्याशी (७६६६८७८३७५) व त्यांचे संपर्क अधिकारी गणेश वाघ (९९२३०४०७३३) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी उपविभागीय अधिकारी तथा सहायक निवडणूक अधिकारी श्रीमती क्रांती डोंबे, संपर्क अधिकारी गणेश वाघ, तहसीलदार सुरेखा नांदे उपस्थित होते. राजकीय पक्षाचे सनियंत्रण करण्यासाठी विविध समिती व भरारी पथकाची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये व्हिडिओ सनियंत्रण समिती (व्हीएसटी), व्हिडीओ पाहणारा चमू (व्हीव्हीटी), स्थिर संनियंत्रण चमू (एसएसटी), लेखांकन करणारा चमू, भरारी पथक, माध्यम प्रमाणीकरण आणि संनियत्रण समितीच्या पथक प्रमुखांनी खर्चाच्या नोंदी अचूक ठेवाव्यात. उमेदवाराने घेतलेल्या खर्चाचा ताळमेळ नोंदी व पथकप्रमुखाच्या नोंदी अचूक असल्याची बाब जाणीवपूर्वक तपासून घ्यावी. अभिरुप नोंदवहीतील नोंदी अद्यावत ठेवाव्यात. तसेच एसएसटी आणि एफएसटी या पथकांनी आपली जबाबदारी दक्षतेने पार पाडावी. निवडणूक कालावधीमध्ये तपासणी नाक्यांवर तपासणी करताना कोणतीही दिरंगाई करू नये, कर्तव्यावर असलेल्या पथक प्रमुख आणि पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हलगर्जीपणा केल्यास योग्य ती दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे निर्देश अन्वर अली यांनी यावेळी सांगितले.

लोकसभा मतदार संघ व विधानसभा मतदार संघनिहाय सहायक निवडणूक खर्च निरीक्षकांनी दैनंदिन नोंदी त्याच दिवशी अभिरुप ताळमेळ नोंदवहीत अचूकपणे नोंदवाव्यात. यामध्ये अजिबात दिरंगाई होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच उमेदवारांचे निवडणुकीशी संबंधित स्वतंत्र बँक खाते असणे आवश्यक आहे. उमेदवारांच्या बँक खात्यातून दैनंदिन काढण्यात येणाऱ्या रकमेवर बारकाईने लक्ष ठेवावेत. तसेच सर्व पथक प्रमुखांनी समन्वयाने काम करावेत. इतर विभागाशी संबंधित माहिती मिळाल्यास ती माहिती संबंधित विभागास कळवावी. जेणेकरुन त्याच्यावर कारवाई करणे सोयीचे होईल. तसेच मतदार संघात मद्य वाटप होणार नाही यावर लक्ष ठेवावे, अशा सूचना श्री. अन्वर अली यांनी दिल्या.

# महाराणा प्रताप चौक ते जाधव हॉस्पिटल पर्यंत शंभर फुटाच्या रस्त्याच्या कामात दिरंगाई

## घरी बसुन अन्नत्याग आंदोलन करणार,माजी सैनिक चुक्कलवाड यांचा इशारा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार । धोंडीबा मुंडे

महाराणा प्रताप चौक ते जाधव हॉस्पिटल पर्यंत शंभर फुटांचा रस्ता झाला पाहिजे यासाठी माजी सैनिक संघटना गेल्या अनेक महिन्यांपासून अंदोलन करत आहे.या संदर्भात जिल्हाधिकारी यांनी संबंधित अधिकारी यांची बैठक घेऊन हा विषय मार्गी लावण्याचे आदेश ही देण्यात आले आहे.केवळ राजकीय द्वशापोटी संबंधित अधिकारी या रस्त्याच्या कामात टाळाटाळ करुन जिल्हाधिकारी यांच्या आदेशाला एकप्रकारे केराची टोपली दाखवुन कामत दिरंगाई करत आहेत.सध्या लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहिता असल्याने कोणतेही आंदोलन करता येत नसल्याने या संदर्भात माजी सैनिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष बालाजी चुक्कलवाड यांनी घरी बसुन अन्नत्याग आंदोलन करण्याचा इशारा प्रदेशीक सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयास निवेदनाद्वारे दिला आहे.

महाराणा प्रताप चौकातुन जाधव हॉस्पिटल पर्यंत जाणाऱ्या रस्ता हा तालुक्याचा मुख्य रस्ता आहे.हा रस्ता राज्य महामार्ग आहे.तालुक्याची वाढती लोकसंख्या व वाहातुकीची वर्दळ लक्षात घेता हा रस्ता शंभर फुटाचा झाला पाहिजे या उद्देशाने माजी सैनिक संघटना अनेक महिन्यांपासून अंदोलन करत आहे.



जिल्हाधिकारी यांनी दोन-तीन वेळा बैठका घेऊन आदेश दिले, असतानाही सार्वजनिक बांधकाम विभाग चे अभियंता वेगवेगळे कारण सांगुन टाळाटाळ करत आहेत.त्यामुळे माजी सैनिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष चुक्कलवाड यांनी अन्नत्याग करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.

या निवेदनात असे नमुद करण्यात आले आहे,की कंधार शहरातील महाराणा प्रताप चौक ते जाधव हॉस्पिटलपर्यंत राज्य मार्ग २५० रस्त्यांचे अतिक्रमण हटवून अंदाज पत्रकानुसार १०० फुटांचे करण्यात यावे यासाठी गेल्या कित्येक दिवसांपासून माजी सैनिक संघटना आपल्या कार्यालयाकडे पाठपुरावा करत आहे,पण आपल्या कार्यालयाकडून उचित कार्यवाही झाली नाही,जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली २ बैठकी पार पडल्या त्या बैठकीमध्ये जिल्हाधिकारी यांनी १०० फुटाचा प्रस्ताव तथा लोकशाहीर अण्णा भाऊ साठे कॉम्प्लेक्स पुनर्रचना करण्याचा प्रस्ताव पाठवण्याचे आदेश दिले आहेत. तरी.आपल्या कार्यालयाकडून हा प्रस्ताव पाठविला नाही .हा रस्ता १९६१ पासूनचा राज्य मार्ग दर्जाचा आहे या रस्त्यावर १९९३ अतिक्रमण करून नगरपालिकेकडून ११ गाळे बांधण्यात आले तरी सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन कुठलीच कार्यवाही झाली नाही.नगरपालिकेच्या डी.पी.प्लॉन मध्ये हा रस्ता डी. पी. रोड़ नसून विद्यमान रस्ता दर्शवला आहे असे नांदेड नगर रचना कारानी लेखी पत्र दिले आहे. २०१९ च्या जीआर नुसार हा रस्ता राज्य मार्गाचा आहे.असे असतानाही सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयाकडून कंधार शहराच्या विकासाची हत्या केली जात आहे. या रस्त्यांचा प्रस्ताव दि.२२ पर्यंत पाठवा अन्यथा पाताळगंगा येथील राहत्या घरी बसुन अन्नत्याग आंदोलन करण्या इशारा माजी सैनिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष चुक्कलवाड यांनी प्रदेशीक सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयास निवेदनाद्वारे दिला आहे.

# आष्टीत आ.सुरेश धस यांच्यावतीने दावत-ए-इफ्तार पार्टी संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजू म्हस्के

भाजपा विधानपरिषदचे आ.सुरेश धस यांच्यावतीने मुस्लिम बांधवांसाठी दावत- ए- इफ्तारचे आयोजन दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी रमजानच्या पवित्र महिन्यात मंगळवार दि.०९ एप्रिल रोजी आष्टी येथील ईदगाह रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. मुस्लिम समाजाचा पवित्र महिन्याचे औचित्य साधून भाजपाचे विधान परिषद आ.सुरेश धस हे दरवर्षी मतदारसंघात मुस्लिम बांधवांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन करतात.सर्वधर्मिय जातीय सलोखा जोपासला जावा, समाजा- समाजामध्ये एकता आणि सामाजिक सलोख्याचा विश्वास अधिक दृढ व्हावा या उद्देशाने रोजा इफ्तार पार्टीचे आ.सुरेश धस यांच्या वतीने आयोजन केले जाते. याचेच औचित्य साधून रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील अनेक नागरिकांनी यावेळी आस्वाद घेतला.यावेळी आ. सुरेश धस यांनी उपस्थित मुस्लिम बांधवांना रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या.यावेळी नगराध्यक्ष जिया बेग, अँड.सय्यद ताहेर,डॉ.अजहर बेग,सय्यद तय्यब,सेवा निवृत्त नायब तहसीलदार सलीम शेख,नूसरत बेग,टाटा बेग, डॉ.नदीम शेख,बब्बुशेठ अत्तार, अस्लम बेग,रिहान बेग,समीर बेग,अज्जू तासकंद, नगरसेवक इर्शन खान, नगरसेवक अस्लम बेग, नगरसेवक समीर शेख, नगरसेवक शरीफ शेख, नगरसेवक भारत मुरकुटे, नगरसेवक किशोर झरेकर, नगरसेवक पप्पू गर्जे,चिंटू अग्रवाल,अमोल शेठ भंडारी, अविनाश शेठ गिरी,अमीन दादा शेख, पै.सादिक कुरेशी, रज्जी बेग,रज्जू शेख,निसार सौदागर गुलाम हाफिज,पत्रकार जावेद पठाण,पत्रकार मुजाहिद्दीन शेख, फैसल चाऊस उस्मान सय्यद, शहानवज पठाण, शेख साजिद, मोहम्मद शेठ कुरेशी, जाकेर सौदागर,शफी कुरेशी,सलीम कुरेशी,अँड.रियाज आदी हिंदू-मुस्लिम बांधव मोठया संख्येने या इफ्तार पार्टीला उपस्थित होते.

# लिंबागणेशकरांच्या गांधीगिरी ने एचसीपीएल कंपनीला आली जाग

## मांजरसुंभा ते पाटोदा राष्ट्रीय महामार्ग बाभळीच्या विळख्यातून मुक्त होणार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

पाटोदा । प्रतिनिधी




अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी महामार्गावरील मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान साईड पंख्यावरील बाभळीच्या झाडांचा विळखा पडल्याने पादचारी तसेच दुचाकी वाहन चालकांना मुख्य रस्त्यावरून चालावे लागत असल्याने अपघाताचे प्रमाण वाढले होते. या प्रकरणी संबंधित एचसीपीएल कंत्राटदार यांना वारंवार कळवुन ही कोणती ही सुधारणा न झाल्याने अखेर १० दिवसांपूर्वी लिंबागणेश येथील ग्रामस्थांनी गांधीगिरी आंदोलन करत ग्रामस्थांनीच बाभळीच्या झाडाझुडुंपाची छाटणी केली होती. या विषयी विविध दैनिकात बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या, त्या नंतर एचसीपीएल कंपनीला जाग आली असुन जेसीबीच्या साह्याने बाभळीची झाडे झुडपे मुळा पासून उपटून साईड पंख्याच्या बाजूला करण्यात येत आहेत.महामार्गावरील बाभळीच्या झाडाझुडपांमुळे दुचाकी वाहन चालकांना अडचण येत होती. या विषयी जिल्हा प्रशासन तसेच एचसीपीएल कंपनीला लेखी निवेदनाद्वारे विनंती करून सुद्धा सुधारणा न झाल्याने १० दिवसांपूर्वी गावातील डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, हरिओम क्षीरसागर, विक्रांत वाणी, संतोष वाणी, कृष्णा वायभट, दादा गायकवाड, संतोष भोसले सह आदिंनी स्वतः कु-हाडीच्या सहाय्याने बाभळीच्या झाडाझुडपांची साफसफाई केली होती. याची विविध दैनिकात मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी झाली होती. अखेर प्रसारमाध्यमांच्या दणक्याने एचसीपीएल कंपनीला जाग आली असुन त्यांनी पाटोदा ते मांजरसुंभा महामार्गावरील बाभळीच्या झाडाझुडपांची जेसीबीच्या सहाय्याने साफसफाई सुरू केली आहे.

# रमजान ईद,डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती प्रमाणे लोकशाहीचा उत्सव सुध्दा शांततेत साजरा करा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । विजय रोडे



परळी शहरात आगामी साजरे करण्यात येणारे पवित्र रमजान ईद, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, रामनवमी उत्सवाच्या निमित्ताने पोलिसांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली शांतता कमिटीची बैठक आज १० एप्रिल रोजी संपन्न झाली. या वेळी बोलताना उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर यांनी आपण रमजान ईद, आंबेडकर जयंती जशी साजरी करणार आहोत तशीच निवडणूक हा लोकशाहीचा उत्सव आहे तो सुद्धा शांततेत साजरा करावा असे आवाहन केले.

पोलीस स्टेशन परळी शहर येथे उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर यांच्या अध्यक्षतेखाली शांतता कमिटीची बैठक संभाजीनगर पोलिस, शहर पोलीस व ग्रामीण पोलिसांच्या वतीने संयुक्त पणे आयोजित करण्यात आली होती. बैठकीस उप विभागीय पोलीस अधिकारी अंबेजोगाई अनिल चोरमाले, तहसीलदार व्यंकटेश मुंडे , नायब तहसीलदार बाबुराव रुपनर, न.प. उपमुख्याधिकारी संतोष रोडे, महावितरणचे उपकार्यकारी अभियंता अभिजीत राठोड तसेच संभाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख, पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय लोहकरे आणि ग्रामीणचे पोलीस निरीक्षक मनीष पाटील यांच्यासह अधिकारी वर्ग उपस्थित होते.

यावेळी उपस्थित जयंती कमिटीचे पदाधिकारी, विविध राजकीय पक्षांचे नेते, कार्यकर्ते , पत्रकार, प्रतिष्ठित नागरिक यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी उत्तरे दिली .तसेच पोलीस निरीक्षक उस्मान शेख, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, उपविभागीय पोलिस अधिकारी अनिल चोरमले व उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर यांनी रमजान ईद, आंबेडकर जयंती उत्सव साजरे करतानाचे नियम तसेच आदर्श आचारसंहिता याविषयी सखोल मार्गदर्शन केले.

## मोतीलाल कोठारी विद्यालयाकडून जनजागृती

# दृधोरण : लोकशाही बळकट करण्यासाठी मताधिकार बजवा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजू म्हस्के

भारताची लोकशाही बळकटीकरण करण्यासाठी निवडणूक विभागासह स्वीप समितीकडून जिल्ह्यातील शाळांना मतदान जनजागृती विशेष मोहीम राबविण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने कडा येथील मोतीलाल कोठारी विद्यालयाच्या वतीने शहरात जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. आगामी लोकसभा निवडणूकीत मतदानाचा टक्का वाढावा यासाठी स्वीप अंतर्गत मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. कडा येथील मोतीलाल कोठारी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शहरातून मतदान रॅली काढली. येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. या उपक्रमात शालेय विद्यार्थी सहभागी झाले होते.

या मतदान जनजागृती अभियानात विद्यार्थ्यांनी जनजागृती करणारे फलक हाती घेऊन केलेल्या मानवी साखळी करत गावात फेरी काढली. या अभियानात मोतीलाल कोठारी विद्यालयाचे मुख्याध्यापक मथाजी शिकारे, उपमुख्याध्यापक प्रकाश सरडे, संजय नाथ,शिल्पा मुटकुळे शैलेश खाडे, रंजना जोशी,पी. एम.हंबर्डे,भीमाशंकर मराठे, एम.बी सातपुते यांच्यासह शिक्षक सहभागी झाले होते.

# राष्ट्रवादीच्या बीड जिल्हा उपाध्यक्षपदी प्रा.माधव साके

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजू म्हस्के

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या (शरदचंद्र पवार) बीड जिल्हा उपाध्यक्षपदी तालुक्यातील कानडी खुर्द- मेहकरी येथील सामाजिक कार्यकर्ते प्रा.माधव साके यांची मंगळवारी (दि.९) निवड करण्यात आली. निवडीचे पत्र प्रा. साके यांना देण्यात आले आहे.



प्रा. माधव साके यांनी तालुक्यातील विविध सामाजिक प्रश्नावर सातत्याने आवाज उठविला आहे. सामाजिक संस्थेच्या माध्यमातूनही त्यांनी अनेक गरजू व्यक्तींना मदत केली असून त्यांचा जनसंपर्क दांडगा आहे. प्रा.साके यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेत राष्ट्रवादीचे प्रदेश अध्यक्ष मा. जयंत पाटील यांच्या आदेशान्वये जिल्हाध्यक्ष आमदार संदीप क्षीरसागर यांनी गुढीपाडव्याच्या दिवशी मंगळवारी प्रा.माधव साके यांना निवडीचे पत्र दिले. या वेळी लोकसभेचे उमेदवार बजरंगबप्पा सोनवणे,माजी आ. बदामराव पंडित, युवक प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख, माजी आमदार साहेबरावजी दरेकर, आष्टी विधानसभा प्रमुख राम खाडे,आष्टी तालुकाध्यक्ष परमेश्वरकाका शेळके,पाटोदा तालुकाध्यक्ष शिवभूषण जाधव, शिरूर कासारचे तालुकाध्यक्ष उपस्थित होते. प्रा.साके यांच्या निवडीबद्दल मुख्याध्यापक दिलीप भवर, ईश्वर साके, हैसराव जगताप, गणेश जगताप, शौकत पठाण, श्रीकांत नवसुपे, संतोष वाडेकर, सचिन काकडे,महादेव भालेराव, रवी वायकर, बाळू जगताप, रणजित पगारे,सचिन वाडेकर, पप्पू थोरवे, बापू खराडे, शशी खराडे, गोवर्धन ढगे आदींनी अभिनंदन करू पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

# श्री क्षेत्र गुगळादेवी देवस्थांनचे शुक्रवार कलशारोहण कार्यक्रम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत



तालुक्यातील श्री क्षेत्र गुगळादेवी देवस्थांनचे शुक्रवार दि.१२ रोजी कलशारोहण कार्यक्रम ह.भ.प शांतिब्रम्ह नवनाथ महाराज श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांच्या हस्ते संपन्न होत आहे.

बीड तालुक्यातील पिंपळनेर सर्कल मधील ईट या गावातील भक्तांच्या हाकेला धाऊन येणारी श्री क्षेत्र गुगळादेवी देवस्थांन हे पंचायत प्रसिद्ध देवस्थान आहे. या देवीच्या दर्शनासाठी नेहमी गर्दी असते. शुक्रवार दि.१२ रोजी ह.भ.प शांतिब्रम्ह नवनाथ महाराज श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांच्या शुभहस्ते श्री क्षेत्र गुगळादेवी देवस्थांन या मंदिराचे कलशारोहण कार्यक्रम होणार आहे. या कलशारोहण कार्यक्रम नंतर महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे. तरी या कलशारोहण कार्यक्रम व महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शत्रूगण डोईफोडे, रामप्रसाद डोईफोडे यांनी केले आहे.

# भारत रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त घरावर निळा झेंडा व विद्युत रोषणाई करा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

पाटोदा । प्रतिनिधी

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, संविधान निर्माते, विश्व रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती जगातल्या बहुतांश देशात साजरी होते. त्या अनुषंगाने यंदाची भीम जयंती साजरी करण्यासाठी प्रत्येक घरावर निळा झेंडा आणि विद्युत रोषणाई करावी असे आवाहन पाटोदा येथील भिम सैनिक प्रतिक जावळे व सुरज भैय्या जावळे यांनी केले आहे. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आपल्यासाठी सर्वात मोठा उत्सव आहे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणजे आपल्यासाठी सर्व काही असून संविधान लिहून माणसाला माणसाचे अधिकार मिळवून देणारे महामानव आहेत तसा युगंधर या पृथ्वीवर पुन्हा जन्मास येणार नाही. म्हणून बीड जिल्ह्यातील सर्व आंबेडकरी जनतेने तसेच पाटोदा तालुक्यातील सर्व आंबेडकरी जनतेने एप्रिल महिन्यामध्ये आपल्या घरावर महिनाभर निळा झेंडा व विद्युत रोषणाई करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती अतिशय आनंदात व उत्साहात साजरी करावी. पाटोदा सार्वजनिक जय भीम महोत्सवाने जसा एक आदर्श निर्माण केला अगदी तसाच प्रमाण गावागावात एक आदर्श जय भीम महोत्सव साजरा करून आपल्या प्रिय डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करावे असे आवाहन भिम सैनिक प्रतिक जावळे व सुरज भैय्या जावळे यांनी सार्वजनिक जयंती उत्सव समिती पाटोदा यांच्या मार्फत केले आहे.



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904